# किनारा

चहुबाजुनी उलटले सारे आभाळ
शरणागतीची माझी शीळ नाही
गुळगुळीत झाले माणसांचे नाणे
माझ्या करणीला तरी खोट नाही।

दिशांना चुकून आले अनेकवेळा
माझ्या नावेला किनाराच नाही।
मनधरणी करावी आला कुणाची
माझ्या रात्रीला नवी पहाटच नाही।

कुणी देवो साथ, कुणी करो घात,
माझ्या ओंजळीत सुख दुःखच नाही
कुणी देवो शाप कुणी देवो हात
माझ्या वाटेला आता पिछाडीच नाही॥

सौ. उज्वला श्रीराम प्रभुणे
"शिलल" स्टेट बँक कॉलनी
अमरावती

